गडचिरोली जिल्हयामध्ये दारुबंदीबाबत अंमलबजावणी व व्यसनमुक्तीच्या दृष्टीने जनतेमध्ये जनजागृती करण्यासाठी पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली संनियंत्रण समिती स्थापन करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक : डीडीपी-२०१९/समिती(गडचिरोली)/प्र.क्र.३०२/सामासु
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक: १९ ऑगस्ट, २०१९

वाचा:-१) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,डीडीपी-२०१९/प्र.क्र.१४९/सुधार-१, दिनांक- १७ ऑगस्ट, २०११
२) मा.मंत्री वित्त आणि नियोजन, वने यांचे पत्र दिनांक- २२.०७.२०१९

प्रस्तावना:-

भारताच्या राज्यघटनेतील अनुच्छेद ४७ मध्ये सार्वजनिक आरोग्य व जनतेच्या आरोग्य रक्षणासाठी (औषधी प्रयोजना व्यतिरिक्त) मादक पदार्थावरील बंदीचे मार्गदर्शक तत्व समाविष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार राज्याचे व्यसनमुक्तीविषयी धोरण निश्चित करण्यात आले असून सामाजिक न्याय विभागाच्या दि.१७.०८.२०११ च्या संदर्भाधीन शासन निर्णयान्वये “महाराष्ट्र राज्याचे व्यसनमुक्ती धोरण” जाहीर करण्यात आले आहे.

सदरहू शासन निर्णयात व्यसनमुक्ती बाबतची सद्य:स्थिती , उत्पादन विषयक धोरण, मद्यसेवन परवाना, दारुसेवन विषयक धोरण, वैध मद्य विक्री परवाना धोरण, वैध दारुबाबत जनतेचा अधिकार, प्रशासकीय जबाबदाऱ्या, ग्राम सभेची कर्तव्ये, व्यसनमुक्ती समित्यांची रचना व कर्तव्ये , व्यसन मुक्तीचा प्रचार व प्रसार, व्यसन मुक्तीसाठी प्रशिक्षण, व्यसन मुक्तीसाठी उपचार इत्यादीबाबत ऊहापोह करण्यात आला आहे.

उपरोक्त शासन निर्णयान्वये व्यसनमुक्ती धोरण जाहीर करताना त्याची यशस्वीपणे अंमलबजावणी करण्यासाठी व्यसनमुक्ती समित्या गठीत करण्याबाबतची तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार दि. १ ऑक्टोबर, २०११ शासन निर्णयाद्वारे राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय

समिती स्थापन करण्यात आलेली आहे. तथापि, गडचिरोली जिल्हयामध्ये दारुबंदीबाबत कडक अंमलबजावणी करण्याकरिता व व्यसनमुक्तीच्या दृष्टीने जनतेमध्ये जनजागृती करण्यासाठी मा.मंत्री वित्त आणि नियोजन, वने यांच्या संदर्भाधीन क्र. २ च्या पत्रान्वये दिलेल्या सुचनांनुसार अंमलबजावणी करण्यासाठी पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली सनियंत्रण समिती तसेच जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय व्यसनमुक्ती नियोजन व अंमलबजावणी समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

गडचिरोली जिल्हयामध्ये दारुबंदीबाबत कडक अंमलबजावणी करण्याकरिता व व्यसनमुक्तीच्या दृष्टीने जनतेमध्ये जनजागृती करण्यासाठी पालकमंत्री, जि. गडचिरोली यांच्या अध्यक्षतेखाली सनियंत्रण समिती व जिल्हास्तरीय नियोजन व अंमलबजावणी यासाठी खालीलप्रमाणे जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात येत असून त्याची रचना व कर्तव्ये खालीलप्रमाणे असतील.

अ) व्यसनमुक्ती सनियंत्रण समितीची रचना

१.	मा.पालकमंत्री , जि. गडचिरोली	अध्यक्ष
२.	विधानसभा / विधान परिषद सदस्य	सदस्य
३.	जिल्हाधिकारी, गडचिरोली	सह अध्यक्ष
४.	मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, गडचिरोली	सदस्य
५.	जिल्हा पोलीस अधीक्षक	सदस्य
६.	जिल्हा अधीक्षक उत्पादन शुल्क	सदस्य
७.	नगर परिषदेचे मुख्याधिकारी	सदस्य
८.	जिल्हा माजी सैनिक अधिकारी	सदस्य
९.	आयुक्त महानगरपालिका	सदस्य
१०.	उपआयुक्त समाज कल्याण	सदस्य
११.	सहायक आयुक्त समाज कल्याण	सदस्य
१२.	जिल्हा समाज कल्याण अधिकारी	सदस्य सचिव

ब) जिल्हास्तरीय व्यसनमुक्ती नियोजन व अंमलबजावणी समिती

१.	जिल्हाधिकारी	अध्यक्ष
२.	मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.	कार्यकारी अध्यक्ष
३.	जिल्हा शिक्षणाधिकारी	सदस्य
४.	स्वयंसेवी संस्थाचा प्रतिनिधी-१	सदस्य
५.	जिल्हा अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क	सदस्य
६.	जिल्हा पोलीस अधीक्षक	प्रतिनिधी
७.	उपआयुक्त समाज कल्याण	सदस्य
८.	सहायक आयुक्त समाज कल्याण	सदस्य
९.	जिल्हा महिला बालविकास अधिकारी	सदस्य
१०.	महिला आर्थिक विकास महामंडळचा प्रतिनिधी	सदस्य
११.	व्यसनमुक्ती कार्यक्रमामध्ये सक्रिय सहभाग असलेल्या संस्थेचा प्रतिनिधी	सदस्य
१२.	जिल्हा समाज कल्याण अधिकारी	सदस्य सचिव

वरीलप्रमाणे विहीत करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय व्यसनमुक्ती नियोजन व अंमलबजावणी समिती यांनी गडचिरोली जिल्हयामध्ये दारुबंदी बाबत कडक अंमलबजावणी करण्याकरिता व व्यसनमुक्तीच्या दृष्टीने जनतेमध्ये जनजागृती करण्यासाठी कार्यक्रम राबवावेत. त्यामध्ये १) दारुबंदी व व्यसनमुक्तीसाठी उत्कृष्ट काम करणाऱ्या बचतगट, पत्रकार, स्वयंसेवी संस्था यांना जिल्हा व तालुकास्तरावर पुरस्कार देण्यात यावे. २) जिल्हास्तरावर शासकीय व स्वयंसेवी संस्थामार्फत व्यसनमुक्तीचे काम करणाऱ्या संस्थांना बळकट करण्यासाठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात यावे.

जिल्हास्तरीय नियोजन व अंमलबजावणी समितीने गडचिरोली जिल्हयातील व्यसनमुक्तीबाबत वरीलप्रमाणे केलेल्या कार्यवाहीच्या अंमलबजावणी संदर्भात केलेल्या उपाययोजना व प्रस्ताव अंतिम करण्याबाबतची कार्यवाही व्यसनमुक्ती संनियंत्रण समितीने करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०८२२१६११२९६१२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

SANJAY GIRIDHAR PATIL

Digitally signed by SANJAY GIRIDHAR PATIL
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=0f7d1eee7567d430eefd928eefa78ed2a6072c4ce8f3c0aa4efaf26d9c32daeb, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=bd10fe5a55495bc381e7b4d4b658250c74eb3f55113a21fd21c8620f04c2c257, ou=SOCIAL JUSTICE DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SANJAY GIRIDHAR PATIL
Date: 2019.08.22 16:16:27 +05'30'

(सं. गि. पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.

२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री, वित्त आणि नियोजन, वने यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.मंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव,
५. मा.मंत्री, गृह विभाग/राज्य उत्पादन शुल्क यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा.राज्यमंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा.राज्यमंत्री, गृह विभाग/राज्य उत्पादन शुल्क यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव (सा.न्या.) यांचे स्वीय सहाय्यक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१०.प्रधान सचिव गृह विभाग/राज्य उत्पादन शुल्क यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
११.विभागीय आयुक्त, नागपूर
१२.जिल्हाधिकारी, गडचिरोली
१३.पोलीस अधिक्षक, जिल्हा गडचिरोली.
१४.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, गडचिरोली
१५.प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, नागपूर विभाग, नागपूर
१६.जिल्हा समाजकल्याण अधिकारी, समाजकल्याण, गडचिरोली.
१७.सहायक आयुक्त, समाज कल्याण, गडचिरोली
१८. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, जिल्हा गडचिरोली,
१९.महिला आर्थिक विकास महामंडळ, गडचिरोली
२०.कार्यासन सामासु (निवडनस्ती).